**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**
**जनसंपर्क विभाग**

---

## तत्वज्ञान पारंगत/आचार्य पदवी प्रवेश परीक्षा - २०१९ साठी आवेदनपत्र आमंत्रित
## ३१ ऑगस्ट अर्ज भरण्याची अंतीम तारीख

अमरावती -

तत्वज्ञान पारंगत/आचार्य पदवी प्रवेश परीक्षा - २०१९ (एमपेट) विद्यापीठाच्यावतीने पाचही जिल्ह्यांमध्ये विविध केंद्रांवर ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. दि. २० ऑगस्ट, २०१९ पासून ऑनलाईन आवेदनपत्र सुरु झाले असून भरण्याची अंतीम तारीख ३१ ऑगस्ट, २०१९ ठेवण्यात आली आहे. तत्वज्ञान पारंगत/आचार्य पदवी प्रवेश परीक्षासंबंधी सर्व सविस्तर माहिती http://sgbau.mahaonline.gov.in आणि www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून आवेदकाला http://sgbau.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करावयाचा आहे. खुल्या वर्गाकरीता रु. १२००/- व मागासवर्गीयांसाठी रु. ७००/- परीक्षा शुल्क निश्चित करण्यात आले असून ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना जमा करावयाचे आहे.

तत्वज्ञान पारंगत/आचार्य पदवी परीक्षेची तारीख लवकरच विद्यापीठाकडून जाहीर होणार आहे. तरी ज्या विद्यार्थ्यांना तत्वज्ञान पारंगत/आचार्य पदवी प्रवेश परीक्षा २०१९ साठी अर्ज सादर करावयाचे आहेत, त्यांनी संकेतस्थळावर दिलेल्या संपूर्ण माहितीचा बारकाईने अभ्यास करुन त्यानुसार दि. ३१ ऑगस्ट पर्यंत आपले ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हेमंत देशमुख व आचार्य कक्षाचे सहा.कुलसचिव श्री सुजय बंड यांचेशी प्रत्यक्ष वा दूरध्वनीवरुन संपर्क साधता येईल.

---

प्रति,
मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. २२/०८/२०१९.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी